# १००व्या जागतिक मिशन दिनानिमित्त पोप महोदयांचा संदेश

## ''ख्रिस्तामध्ये एक, मिशनमध्ये संघटीत''

प्रिय बंधू आणि भगिनींनो,

पोप अकरावे पायस ह्यांनी स्थापित केलेल्या आणि चर्चला अत्यंत प्रिय असलेल्या जागतिक मिशन दिवसाच्या शताब्दीनिमित्त जागतिक मिशन दिन २०२६ साठी मी ''ख्रिस्तामध्ये एक, मिशनमध्ये संघटीत'' ही संकल्पना निवडली आहे. ज्युबिली वर्षानंतर, मी संपूर्ण चर्चला पवित्र आत्म्यात आनंद आणि आवेशाने आपला मिशनरी प्रवास सुरु ठेवण्यासाठी प्रोत्साहित करू इच्छितो. ह्यासाठी ख्रिस्तामध्ये एकरूप झालेली अंत:करणे, समेट करणारे समुदाय आणि प्रत्येकामध्ये, औदार्य आणि विश्वासाने कार्य करण्याची तयारी आवश्यक आहे.

जेव्हा आपण ख्रिस्तामध्ये एक आणि मिशनमध्ये संघटीत आहोत ह्यावर चिंतन करीत असताना आपण स्वत:ला दैवी कृपेच्या मार्गदर्शन आणि प्रेरणेद्वारे प्रोत्साहित करू या, जेणेकरून ''आपल्या मिशनरी पाचारणाच्या अग्नीचे आपल्यामध्ये नूतनीकरण होईल.'' चर्चच्या इतिहासात ह्या ''नवीन मिशनरी युगात'' सुवार्तीकीकरणाच्या वचनबद्धतेत आपणास एकत्र पुढे जाता येईल. ( प्रवचन, मिशनरी जगाची आणि स्थलांतरितांची ज्युबिली, ५ ऑक्टोबर २०२५).

### १) ख्रिस्तामध्ये एक मिशनरी शिष्य ख्रिस्तामध्ये आणि आमच्या बंधू भगिनीसह संघटित

ख्रिस्ताशी एकरूप होण्याचे रहस्य मिशनच्या केंद्रस्थानी आहे त्याच्या दुःख सहनाच्या आधी येशूने आपल्या पित्याजवळ प्रार्थना केली. ''त्या सर्वांनी एक व्हावे; हे माझ्या पित्या मी तुझ्यामध्ये तसे त्यांनीही तुझ्या-माझ्यामध्ये एक व्हावे''( योहान १७:२१). हे शब्द येशूची सर्वात खोल इच्छा तसेच त्याच्या शिष्यांचा समुदाय म्हणून चर्चची ओळख प्रकट करतात. म्हणजेच, एक समुदाय जो पवित्र त्रैक्यामधून वाहतो आणि त्याद्वारे टिकून राहतो. ही सर्व मानवांमधील बंधुत्वाच्या सेवेसाठी आणि सर्वसृष्टीशी सुसंवाद साधण्यासाठी असलेली सहभागीता आहे.

ख्रिस्ती असणे हे प्रामुख्याने आचरण किंवा कल्पनांबद्दल नाही तर ते ख्रिस्ताबरोबरील एकात्मतेचे जीवन आहे, ज्यामध्ये आपण पवित्र आत्म्यामध्ये पित्याबरोबर त्याच्या पुत्रत्वाच्या नातेसंबंधात सहभागी होतो. ह्याचा अर्थ असा आहे की द्राक्षवेलीच्या फांद्याप्रमाणे ख्रिस्तामध्ये टिकून राहणे ( पाहा योहान १५:४ ) आणि पवित्र त्रैक्याच्या जीवनात पूर्णपणे समाविष्ट होणे. हे ऐक्य विश्वासूजनांमध्ये फलदायीपणाचे स्त्रोत आहे. खरे पाहता, संत जॉन पॉल द्वितीय ह्यांनी शिकवल्याप्रमाणे, ''सहभागीता मिशनचे स्त्रोत आणि फळ, दोन्ही दर्शवते'' (प्रेषितीय परिपत्रक, क्रिस्टिफिडेलेस लाईची ३२).

ह्या संदर्भात, चर्चची प्राथमिक मिशनरी जबाबदारी म्हणजे ख्रिस्ती लोकांमधील आध्यात्मिक आणि बंधुत्वाच्या एकतेचे नूतनीकरण करणे आणि ती एकता टिकवून ठेवणे, बऱ्याच परिस्थितींमध्ये, आपल्याला संघर्ष, विभाजन, गैरसमज आणि परस्पर विश्वासाचा अभाव ह्यांचा सामना करावा लागतो. जेव्हा हे आपल्या ख्रिस्ती समुदायांमध्येही घडते तेव्हा ते आपल्या साक्ष देण्याच्या कृतीला कमजोर करते. प्रभू येशू ख्रिस्ताने आपल्या शिष्यांवर सोपवलेल्या सुवार्तेच्या मिशनसाठी, सर्वात महत्त्वाचे म्हणजे, समेट आणि सहवास ह्यासाठी उत्सुक असलेल्या अंत:करणांची

आवश्यकता आहे. परिणामी, नायसीया येथील धर्मपरिषदेच्या १७००व्या वर्धापन दिनाच्या संयुक्त साजरीकरणातून उद्धवलेल्या संधीवर आधारित, सर्व ख्रिश्चन चर्चेससह एक्युमेनिकल प्रयत्न तीव्र करणे महत्त्वाचे आहे.

शेवटचे परंतु महत्त्वाचे म्हणजे, ''ख्रिस्तामध्ये एक'' असणे हे आपल्याला प्रभुवर आपली दृष्टी स्थिर ठेवण्यास सांगते, जेणेकरून तो खरोखरच आपल्या जीवनाच्या आणि समुदायांच्या केंद्रस्थानी असेल, प्रत्येक शब्द, कृती आणि परस्पर नातेसंबंधाचा केंद्रबिंदू असेल, ज्यामुळे आपण आश्चर्याने म्हणतो: ''ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्यामध्ये जगतो'' ( गलती २:२०) ख्रिस्ताचे वचन सतत ऐकून आणि साक्रामेंतांच्या कृपेने आपल्याला चर्चमध्ये जिवंत दगड बनणे शक्य होईल. आज चर्चला द्वितीय व्हॅटिकन परिषद आणि मॅजिस्टेरियम, विशेषत: पोप फ्रान्सिस ह्यांच्या धर्मोपदेशाचे मूलभूत विषय हाती घेण्याचे आवाहन केले आहे. खरं तर, संत पौल म्हणतो त्याप्रमाणे, ''आम्ही स्वतःची घोषणा करत नाही; आम्ही येशू ख्रिस्ताला प्रभू म्हणून घोषित करतो'' (२ करिंथ ४:५). ह्या कारणास्तव, मी संत पोप सहावे पॉल ह्यांच्या शब्दांचा पुनरुच्चार करतो: ''देवाचा पुत्र, नाझरेथच्या येशूचे नाव, शिकवण, जीवन, अभिवचने, राज्य आणि रहस्य घोषित केले जात नसेल तर तो खरा सुवर्ता प्रसार नाही'' (अपोस्टॉलिक उपदेश, इव्हांजली नुन्सियांन्डी २२ ). संपूर्ण मानव जातीपर्यंत खऱ्या सुवार्ता प्रसाराची ही प्रक्रिया प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीच्या हृदयातून सुरू होते. म्हणूनच, आपण ख्रिस्तामध्ये जितके अधिक एकजूट होऊ तितकेच त्याने आपल्यावर सोपवलेले कार्य पार पाडण्यास अधिक सक्षम होऊ.

**२) मिशनमध्ये संघटित - ह्यासाठी की जगाने प्रभूवर विश्वास ठेवावा**

शिष्यांचे ऐक्य हे अंतिम ध्येय नाही; हे ऐक्य मिशनच्या दिशेने निर्देशित आहे. प्रभू येशू हे स्पष्टपणे सांगतो: ''ह्यासाठी की, तू मला पाठवले आहे, असा जगाने विश्वास धरावा'' (योहान १७:२१). सामंजस्यपूर्ण, बंधुभाव आणि संघटित समुदायांच्या साक्षीद्वारेच सुवार्तेच्या घोषणेला तिची पूर्ण संवाद शक्ती प्राप्त होते. ह्या दृष्टिकोनातून, धन्य पाओलो मन्ना ह्यांचे ब्रीदवाक्य लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे, ''सर्व चर्चेस संपूर्ण जगाच्या परिवर्तनासाठी एकत्र आली'' जे १९१६ मध्ये पॉन्टिफिकल मिशनरी युनियनच्या स्थापनेस प्रेरित करणारा आदर्श थोडक्यात व्यक्त करते. त्याच्या ११०व्या वर्धापन दिनानिमित्त, मी ह्या संस्थेच्या वचनबद्धतेबद्दल कृतज्ञता आणि आशीर्वाद व्यक्त करतो, जी याजक, व्रतस्थ आणि प्रापंचिकांमध्ये मिशनरी भावना जागृत व विकसित करते आणि सर्व सुवार्ता प्रसाराच्या प्रयत्नांमध्ये एकतेला प्रोत्साहन देते. खरं तर, कोणतीही बाप्तिस्मा घेतलेली व्यक्ती मिशनपासून वगळलेली किंवा तटस्थ नाही: प्रत्येकजण आपापल्या पाचारणानुसार आणि जीवनाच्या स्थितीनुसार ख्रिस्ताने त्याच्या चर्चवर सोपवलेल्या महान कार्यात सहभागी होतो. पोप फ्रान्सिस ह्यांनी आम्हाला वारंवार आठवण करून दिल्याप्रमाणे सुवार्तेची घोषणा करणे ही एक अशी कृती आहे जी नेहमी सुसंवादी, सामुदायिक आणि सिनोडल असते.

ह्या कारणास्तव, मिशनमधील ऐक्य म्हणजे सहभागीता आणि मिशनरी सहकार्याच्या आध्यात्मिकतेचे रक्षण आणि संगोपन करणे होय. दररोज ह्या वृत्तीचे पालन केल्याने, देवाची कृपा हळूहळू आपल्याला आपल्या बंधू-भगिंनीकडे विश्वासाच्या नजरेतून पाहण्यास शिकवते. प्रत्येक व्यक्तीमध्ये पवित्र आत्मा जे चांगले प्रेरित करतो ते आनंदाने ओळखणे, विविधतेला अनमोल ठेवा म्हणून स्वीकारणे व एकमेकांचे ओझे वाहतो आणि नेहमीच वरून येणाऱ्या ऐक्याचा शोध घेणे देखील आपण शिकतो. खरोखरच आपण एकाच मिशनमध्ये सहभागी होतो, कारण आपण सर्वजण ''एकच प्रभू ,एकच विश्वास, एकच बाप्तिस्मा, एकच परमेश्वर, जो सर्वांचा पिता, जो सर्वांवर व सर्वांमधून

आणि सर्वांच्या ठायी आहे'' हे मान्य करतो ( इफिस ४:५-६). हे अध्यात्म मिशनरी शिष्यत्वाची दैनंदिन अभिव्यक्ती आहे. हे आपल्याला चर्चच्या सुवार्तिक मिशनची सार्वत्रिक दृष्टी पुनर्प्राप्त करण्यास आणि एकाच प्रभूच्या अनुयायांच्या समन्वित प्रयत्नांच्या अभावावर आणि गटबाजीवर मात करण्यास मदत करते - जसे की, ''मी पौलचा आहे'', ''मी अपुल्लोसचा आहे'' ( पाहा १ करिंथ १:१०-१२).

हे सांगण्याची गरज नाही की, मिशनरी ऐक्य हे एक सारखेपणा म्हणून समजले जाऊ नये, परंतु त्याऐवजी ते एकाच हेतूसाठी विविध वरदानांचे अभिसरण म्हणून समजले पाहिजे, म्हणजे ख्रिस्ताचे प्रेम दृश्यमान करणे आणि प्रत्येकाला ख्रिस्ताला भेटण्यासाठी आमंत्रित करणे. जेव्हा स्थानिक समुदाय एकमेकांना सहकार्य करतात आणि जेव्हा सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि धार्मिक विधींमधील भिन्नता एकाच विश्वासात पूर्णपणे आणि सुसंवादाने व्यक्त केली जाते तेव्हाच सुवार्ता प्रचार साधला जातो. म्हणून मी चर्चमधील सर्व संस्थांना चर्चच्या मिशनरी समुदायाची भावना बळकट करण्यास व मिशनसाठी आणि मिशनमध्ये एकमेकांना सहकार्य करण्याचे कल्पक आणि ठोस मार्ग विकसित करण्यास प्रोत्साहित करतो.

ह्यासंदर्भात मी पॉन्टिफिकल मिशन सोसायटीच्या सेवेबद्दल त्यांचे आभार मानू इच्छितो, जे मी पेरू मधील माझ्या सेवेदरम्यान कृतज्ञतेने अनुभवले आहे. ह्या संस्था - प्रॉपगेशन ऑफ द फेथ, होली चाइल्डहूड, सेंट पीटर द अपॉस्टल आणि पॉन्टिफिकल मिशनरी युनियन - सर्व वयोगटातील श्रद्धावंतांमध्ये मिशनरी जागरूकता वाढवणे व तयार करणे आणि जगभरातील समुदायांना जोडणाऱ्या प्रार्थना व उदारपणा ह्या गोष्टींना प्रोत्साहन देणे सुरू ठेवतात. येथे, हे लक्षात घेण्यासारखे आहे की, सोसायटी ऑफ द प्रोपेगेशन ऑफ द फेथची संस्थापिका धन्य पौलीन मारी जॅरीकोट ह्यांनी दोनशे वर्षांपूर्वी 'लिव्हिंग रोझरीची' स्थापना केली. आजही ही चळवळ जगभरातील अनेक श्रद्धावंताना प्रत्येक अध्यात्मिक आणि मिशनरी गरजेसाठी प्रार्थना करण्यासाठी एकत्र आणत आहे. हे देखील लक्षात ठेवण्यासारखे आहे की, सोसायटी ऑफ द प्रोपेगेशन ऑफ द फेथच्या प्रस्तावानंतर पोप अकरावे पायस ह्यांनी १९२६ मध्ये 'जागतिक मिशन दिनाची' स्थापना केली. ह्या दिवशी गोळा केलेले वार्षिक दान, पोप महोदयांच्या वतीने चर्चच्या मिशनच्या विविध गरजा भागवण्यासाठी व वरील संस्थांद्वारे वितरित केले जाते. म्हणूनच, वर नमूद केलेल्या चारही संस्था एकत्रितपणे आणि प्रत्येक संस्था आपापल्या वैशिष्ट्यानुसार आजही संपूर्ण चर्चसाठी एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. ह्या संस्था ऐक्य आणि चर्चच्या मिशनरी सहभागीतेच्या जिवंत चिन्ह आहेत. मी सर्वांना कृतज्ञतेच्या भावनेने त्यांच्याबरोबर काम करण्यासाठी आमंत्रित करतो.

### ३) प्रेम करण्याचे मिशन - देवाच्या विश्वासू प्रेमाची घोषणा करणे, ते जगणे आणि इतरांना वाटणे

ऐक्य ही जर मिशनची अट असेल तर प्रेम हे त्याचे सार आहे. आम्ही जगाला घोषित करीत असलेली सुवार्ता ही एक अमूर्त कल्पना नाही; ही सुवार्ता देवाच्या विश्वासू प्रेमाचे शुभवर्तमान आहे, हे येशू ख्रिस्ताचा चेहऱ्यात आणि जीवनात देह बनले. शिष्य आणि चर्चचे मिशन पवित्र आत्म्यामध्ये ख्रिस्ताचे कार्य चालू ठेवणे आहे: हे मिशन प्रेमातून जन्मलेले, प्रेमाने जगलेले आणि प्रेमाकडे नेणारे आहे. खरे तर, स्वतः प्रभू येशूने त्याच्या दुःखसहनापूर्वी पित्याठायी केलेल्या महान प्रार्थनेत आपल्या शिष्यांमध्ये एकतेचे आवाहन केल्यानंतर, असा निष्कर्ष काढला: ''ह्यासाठी की, जी प्रीती तु माझ्यावर केलीस ती त्यांच्यामध्ये असावी आणि मी त्यांच्यामध्ये असावे'' (योहान १७:२६). ख्रिस्ताच्या प्रेमाने प्रेरित होऊन, प्रेषित नंतर ख्रिस्तासाठी सुवार्ता सांगण्यास बाहेर पडले (पाहा २ करिंथ ५:१४). त्याचप्रमाणे,

शतकानुशतके, असंख्य ख्रिस्ती लोकांनी - रक्तसाक्षी, साक्ष देणारे आणि मिशनरी - देवाचे प्रेम जगाला कळवण्यासाठी आपले जीवन अर्पण केले. अशा प्रकारे, प्रेमाचा आत्मा, पवित्र आत्मा ह्याच्या मार्गदर्शनाने, चर्चचे सुवार्ता कार्य जगाच्या शेवटापर्यंत चालू राहील.

मी आजच्या जगातील मिशनऱ्यांचे विशेष आभार मानू इच्छितो. संत फ्रान्सिस झेवियर प्रमाणेच, त्यांनी सुवार्तेची घोषणा करण्यासाठी आणि ख्रिस्त व त्याच्या प्रेमाला जे बऱ्याचदा आव्हानात्मक, गरीब, संघर्षग्रस्त किंवा सांस्कृतिक दृष्टया दूर असतात, त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी आपली मातृभूमी, कुटुंब आणि आपल्या सुरक्षिततेची पर्वा न करता झोकून दिले आहे. प्रतिकूल परिस्थिती आणि मानवी मर्यादा असूनही ते स्वतःला आनंदाने समर्पित करित राहतात, कारण त्यांना माहित आहे की, स्वतः ख्रिस्त आणि त्याची सुवार्ता हे आपण इतरांना देऊ शकणारा सर्वात मोठा खजिना आहे. आपल्या चिकाटीद्वारे ते हे दाखवून देतात की, देवाचे प्रेम सर्व अडथळयांच्या पलीकडे आहे. जगाला अजूनही ख्रिस्ताच्या ह्या धैर्यवान साक्षीदारांची गरज आहे आणि चर्च समुदायांना अजूनही नवीन मिशनरी पाचारणांची आवश्यकता आहे. आपण त्यांना नेहमी आपल्या अंत:करणाजवळ ठेवले पाहिजे आणि त्यांच्यासाठी पित्याजवळ सतत प्रार्थना केली पाहिजे. पिता आम्हाला तरुण आणि प्रौढांची देणगी देईल जे पृथ्वीच्या शेवटापर्यंत सुवार्तेच्या मार्गावर ख्रिस्ताचे अनुसरण करण्यासाठी सर्व गोष्टींचा त्याग करण्यास तयार आहेत.

पुरुष आणि महिला मिशनऱ्यांसाठी आदराने भारावून, मी संपूर्ण चर्चला विशेष आवाहन करतो की, त्यांनी ख्रिस्तामधील आपल्या जीवनाच्या साक्षीद्वारे, प्रार्थनेद्वारे आणि मिशनमधील आपल्या योगदानाद्वारे सुवार्ता प्रसाराच्या मिशनमध्ये सामील व्हावे. असीसीचे संत फ्रान्सिस ह्यांनी म्हटल्याप्रमाणे, ''प्रेमावर प्रेम केले जात नाही'' आणि त्याच्या स्वर्गात जाण्याच्या आठशेव्या स्मृती दिनानिमित्त आम्ही त्याच्याकडे एका विशेष दृष्टिकोनातून पाहतो. ख्रिस्त प्रभूच्या प्रेमात जगण्याच्या आणि जवळच्या तसेच दूरच्या लोकांपर्यंत ते प्रेम पोहोचण्याच्या त्याच्या इच्छेमध्ये आपण प्रेरणा शोधू या. कारण त्याने म्हटल्याप्रमाणे, ''ज्याने आपल्यावर खूप प्रेम केले आहे त्याच्यावर आपण खूप प्रेम केले पाहिजे.'' (बॅग्नेरेगिओचे सेंट बोनाव्हेंचर, द लाइफ ऑफ सेंट फ्रान्सिस, अध्याय IX, १; फोन्टी फ्रांसेस्केन ११६१). आपण बाळेशूची संत तेरेसा हिच्या आवेशापासून देखील प्रेरणा घेऊ या. जीने जाहीर केले आहे की, ती मृत्यूनंतरही आपले मिशनकार्य पुढे चालू ठेवील: ''मी स्वर्गात त्याच गोष्टीची इच्छा करेन जी मी आता पृथ्वीवर करते: येशूवर प्रेम करावे आणि त्याच्यावर प्रेम करण्यास लावणे'' ( पत्र २२० आबे बेलियर, २४ फेब्रुवारी १८९७).

ह्या साक्षींद्वारे प्रेरित होऊन आपण सर्वजण आपल्या स्वतःच्या पाचारणानुसार आणि आपल्याला मिळालेल्या दानांनुसार सुवार्ता प्रसाराच्या महान मिशनमध्ये योगदान देण्यास वचनबद्ध होऊ या, जे नेहमीच प्रेमाचे कार्य असते. विशेषत: 'जागतिक मिशन दिनाच्या' दिवशी, आपल्या प्रार्थना आणि आपल्या पाठिंब्यामुळे देवाच्या प्रेमाची सुवार्ता प्रत्येकापर्यंत, विशेषत: सर्वांत गरीब आणि सर्वात जास्त गरजू लोकांपर्यंत पोहचविण्यास खूप मोठी मदत होईल. प्रत्येक देणगी, मग ती कितीही लहान असो, ती मिशनरी ऐक्य साधण्याची एक अर्थपूर्ण कृती बनते. ''जगभरातील मिशनऱ्यांना मदत करण्यासाठी तुम्ही मला जी काही मदत कराल त्याबद्दल मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो'' (जागतिक मिशन दिवस २०२५, १९ ऑक्टोबर २०२५साठी व्हिडिओ संदेश). आध्यात्मिक ऐक्य वाढवण्यासाठी मी हया साध्या प्राथनेद्वारे तुम्हाला माझा आशीर्वाद देतो:

‘‘हे परम पित्या, आम्हाला ख्रिस्तामध्ये एक बनव, त्याच्या संघटीत व  नूतनीकरण करणाऱ्या प्रेमामध्ये आम्हाला दृढ कर.  चर्चचे सर्व सदस्य मिशनमध्ये संघटित, पवित्र आत्म्याठायी आज्ञाधारक, सुवार्तेची  साक्ष देण्यास धैर्यवान आणि सर्वसृष्टीवरील तुझ्या विश्वासू प्रेमाची घोषणा करणारे व ते दररोज आचरणात आणणारे असोत.

सर्व मिशनरी पुरुष व स्त्रियांना आशीर्वादीत कर. त्यांच्या प्रयत्नामध्ये त्यांना यश दे आणि आशेने त्यांचे रक्षण कर !

पवित्र मरिया,  मिशनची राणी, जी पृथ्वीच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात  स्वतः सुवार्ता प्रसाराच्या कार्यामध्ये आम्हांबरोबर आहे: आम्हाला  शांतीची साधने बनव  आणि आम्हावर अशी कृपा कर की संपूर्ण जग ख्रिस्तामध्ये  तारण देणारा प्रकाश ओळखेल. आमेन.

(व्हॅटिकनकडून, २५  जानेवारी २०२६,  सामान्य काळातील तिसरा रविवार, संत पौलच्या परिवर्तनाचा सण)

**+ पोप  चौदावे लिओ**